# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१५१/१५३

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-५०/S-Scheme to J-Scheme/२०२१-२२/ 1574 दिनांक : 0 3 MAR 2022

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नीत औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रम
राबविणा-या सर्व संस्था

**विषय : फार्मसी अभ्यासक्रमातील Educational Regulation ER-91 नुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी S-Scheme नुसार अभ्यासक्रम पूर्ण करणेबाबत व परीक्षा देणेबाबत..**

फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी पत्र क्र. १४-५५-२०२१-PCI(१)/३६४२-४५, दि. २३/०९/२०२१ द्वारे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून Education Regulations – ER-2020 ची अंमलबजावणी आणि काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली (PCI) द्वारे जाहीर केलेल्या दि. ०९/१०/२०२० रोजीच्या राजपत्र अधिसूचनेच्या प्रकरण ४ मधील कलम २२ मध्ये खालीलप्रमाणे उल्लेख केला आहे-

**“ A person who was admitted as a student under the said regulations (ER-91) to the course of training for Diploma in Pharmacy and who had not passed the examination at the commencement of these regulations, shall be required to pass the examination in accordance with the provisions of the said regulations as if these regulations had not come into force:**

**Provided however, the Examining Authority in a particular State may fix a date after which the examinations under the said Regulations shall not be conducted.”**

मंडळाद्वारे ER-91 करीता S-Scheme राबविण्यात आली होती व ER-2020 Regulations साठी J-Scheme उपलब्ध करून दिलेली आहे. फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या वरील निर्देशाच्या अनुषंगाने मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG-18 मधील तरतुदीनुसार ER-91 रेग्युलेशन व S-Scheme मधील औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शेवटच्या नियमित (Regular) परीक्षेपासून पुढील सलग ४ परीक्षेमध्ये हा अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण होण्याकरीता संधी देण्यात येत आहे. त्याबाबतचे सविस्तर विवरण खालीलप्रमाणे आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये S-Scheme करीता प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांची शेवटची बॅच (तुकडी) होती व सदर विद्यार्थ्यांची शेवटची नियमित परिक्षा उन्हाळी परीक्षा – २०२१ मध्ये घेण्यात आली होती. त्यामुळे PH1S मधील उन्हाळी परीक्षा २०२१ नंतर **सलग ४ परीक्षा म्हणजे–(i)हिवाळी परीक्षा-२०२१, (ii) उन्हाळी परीक्षा-२०२२, (iii)हिवाळी परिक्षा-२०२२ व (iv) उन्हाळी परिक्षा-२०२३ पर्यंत PH1S अभ्यासक्रम पूर्ण करुन उत्तीर्ण होण्याची संधी देण्यात येत आहे.** तदनंतर औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील S-Scheme (PH1S) ची कोणतीही परीक्षा मंडळाद्वारे घेण्यात येणार नाही.

२) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये द्वितीय वर्ष औषधनिर्माण शास्त्र S-Scheme अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांची शेवटची बॅच असून नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा उन्हाळी परीक्षा–२०२२ मध्ये घेण्यात येईल. त्यामुळे PH2S मधील उन्हाळी परीक्षा २०२२ नंतर **सलग ४ परीक्षा म्हणजे–(i) हिवाळी परीक्षा-२०२२, (ii) उन्हाळी परीक्षा-२०२३, (iii) हिवाळी**

**परिक्षा-२०२३ व (iv) उन्हाळी परिक्षा-२०२४ पर्यंत PH2S अभ्यासक्रम पूर्ण करुन उत्तीर्ण होण्याची संधी देण्यात येईल.** तदनंतर औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमातील द्वितीय वर्षातील S-Scheme (PH2S) ची कोणतीही परीक्षा मंडळाद्वारे घेण्यात येणार नाही.

**या व्यतिरिक्त प्रथम वर्ष S-Scheme अंतर्गत औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे महत्त्वाच्या सूचना देण्यात येत आहेत —**

अ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व त्या आधी जे विद्यार्थी ER-91 रेग्युलेशन व S-Scheme नुसार प्रथम वर्षात प्रवेशित आहेत; परंतु मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील RG-6 नुसार सत्र पूर्ण न केल्याने Disallowed (DIS) झालेले आहेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांची नोंदणी मंडळाद्वारे झालेली आहे, परंतु विद्यार्थ्याने प्रथम वर्षाचे सत्र पूर्ण केलेले नाही आणि प्रथम वर्षाकरीता नियमित परीक्षा अर्ज भरलेला नाही, या कारणाने संस्थेने विद्यार्थ्यांना Disallowed (DIS) केलेले नसेल, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून प्रथम वर्षात ER-2020 नुसार नवीन अभ्यासक्रमातील "J" Scheme मध्ये पुन:प्रवेश घेणे अनिवार्य राहील. सदर विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमानुसार (ER-2020) सत्र पूर्ण करावे लागेल. तसेच सदर विद्यार्थ्यांना " Change of Scheme" (PH1S to PH1J) पात्रता प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. त्यानंतरच सदर विद्यार्थ्यांचा प्रथम वर्षाकरीता J-Scheme नुसार परीक्षा अर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.

ब) ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ किंवा त्यापूर्वी ER-91 नुसार S-Scheme अभ्यासक्रमात प्रथम वर्षात प्रवेश घेतला होता व मंडळाच्या परिक्षा विषयक नियमावलीतील RG-6 नुसार प्रथम वर्षाचे सत्र पूर्ण केले आहे; परंतु प्रथम वर्षाकरीता नियमित परीक्षा अर्ज भरलेला नाही, अशा विद्यार्थ्यांचे PH1S चे सत्र परीक्षा विषयक नियमावलीतील RG-6 नुसार पूर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र संस्थेच्या प्राचार्यांनी विभागीय कार्यालयास सादर केल्यास त्यांना पुढील उन्हाळी परीक्षेसाठी S-Scheme नुसार नियमित परीक्षा अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील. **प्रथम वर्ष उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा ATKT / FT निकालासह सदर विद्यार्थी द्वितीय वर्षाकरिता पात्र झाल्यास अशा विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष (PH2S) सुध्दा ER-91 नुसार S-Scheme अभ्यासक्रमानुसार सत्र पूर्ण करणे बंधनकारक राहील.**

क) जे विद्यार्थी प्रथम वर्ष PH1S मध्ये उत्तीर्ण असतील किंवा प्रथम वर्षातील निकालानुसार द्वितीय वर्षात प्रवेशासाठी पात्र असतील, अशा विद्यार्थ्यांकरीता संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत द्वितीय वर्षाचे (PH२S) शैक्षणिक कामकाज मंडळाच्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार आयोजित करून S-Scheme नुसार PH2S चे सत्र पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची राहील. तसेच अशा विद्यार्थ्यांकरीता मुद्दा क्र. १ नुसार प्रथम वर्षाकरीता अंतिम संधी उन्हाळी परीक्षा-२०२३ पर्यंत व मुद्दा क्र. २ नुसार द्वितीय वर्षाकरीता अंतिम संधी उन्हाळी परीक्षा-२०२४ पर्यत राहील.

ड) ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय वर्षाचे सत्र ER-91 रेग्युलेशन व S-Scheme नुसार पूर्ण केले असून प्रथम व द्वितीय वर्षातील विषयात अनुतीर्ण आहेत, अशा विद्यार्थ्यांनी मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र. २ मध्ये नमूद दिलेल्या मुदतीत परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा PCI च्या वर उल्लेखीत निर्देशानुसार असे विद्यार्थी ER-91 नुसार औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी गमावतील.

तरी संस्थाप्रमुखांनी या परीपत्रकातील मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र. २ मधील विवरण तसेच मुद्दा क्र. अ, ब, क, ड मधील महत्त्वाच्या सूचना संबंधित विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्या निदर्शनास आणून त्याबाबत त्यांना मार्गदर्शन करावे. याबाबत काटेकोरपणे कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत : १. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव मानार्थ सादर
२. उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर, औरंगाबाद यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
३. उपसचिव, का. क्र. ४० व ४२ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता